(2)

महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ५३९ दि.- ४/५/२०१८

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - ०४/०५/२०१८ दिनांक - दुपारी १२.३० वा.

स्थळ - महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री. दिपक देविदास शिंदे**
स.नं.११०/४, रामटेकडी,
हडपसर, पुणे ४११०१३. } **अपिलार्थी**

**श्रीमती अस्मिता पोटे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** प्र.उप अधिक्षक

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री.दिपक देविदास शिंदे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०६/०३/२०१८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा प्र. उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक १३/०३/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी बिबवेवाडी सहाय्यक आयुक्त कार्यालय मधील स्थायी व अस्थायी पदी सेवकांची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०६/०३/२०१८ | १३/०३/२०१८ | ०५/०४/२०१८ | २१/०३/२०१८ व ०६/०४/२०१८ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक ११/०४/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ११/०४/२०१८ | ११/०४/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.०४/०५/२०१८ रोजी सकाळी १२.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - अनुपस्थित
सुनावणीस तत्कालीन जनमाहिती अधिकारी - अनुपस्थित
सद्यस्थितीतील जनमाहिती अधिकारी व सहा. जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|---|
| अ | बिबवेवाडी सहाय्यक आयुक्त कार्यालय पुणे महानगरपालिका मधील विविध विभागाप्रमाणे स्थायी व अस्थायी कोण कोणती पदे अस्तित्वात आहे याची माहिती मिळावी. | महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालया मधील स्थायी व अस्थायी पदी सेवकांच्या माहिती प्रतींच्या १४ पानांकरिता र.रू.२/- प्रति पान प्रमाणे र.रू.२८/- चे सोबत जोडलेले चलन क्र.५५०९ म.न.पा. कोषागरात भरून त्याची प्रत कार्यालयात सादर |
| आ | सदर पदावर कार्यरत असलेल्या सेवकांची नावे तसेच | |

| | | |
|---|---|---|
| | त्यांची नेमणूक दिनांक कागद पत्रांसह माहिती मिळावी. | केलेनंतर सदरची माहिती आपणांस उपलब्ध करून देणेत येईल. |
| इ | सदर पदांवर कार्यरत असलेल्या सेवकांचे मूळ हुद्दे तसेच त्यांना आज रोजी देणेत आलेल्या कामाचे स्वरूप व जबाबदारी काय आहे याची कागद पत्रांसह माहिती मिळावी. | |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०४/०५/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु, मा.महापौर, पुणे शहर यांनी प्लास्टीक बॅग बंदीबाबत मोहिम बैठक आयोजित केल्याने सदरची सुनावणी दि.०४/०५/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित केली असल्याबाबत अपिलार्थी यांना दुरध्वनीवरून कळविलेले होते. अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळावी म्हणून अपिलार्थी यांचेशी दुरध्वनीवरून चर्चा करून अन्य दिवशी सुनावणी आयोजित करणेबाबत विचारणा केली असता, अपिलार्थी श्री.दिपक शिंदे यांनी अन्य दिवशी अपिल सुनावणी आयोजित न करता, त्यांच्या अनुपस्थितीत अपिल सुनावणीची कार्यवाहि करून अपिल आदेश पारित करणेबाबत कळविलेले आहे.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.दिपक देविदास शिंदे हे अनुपस्थित होते. सदर दिनांकास श्रीमती अस्मिता पोटे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका या प्रवासी रजेवर असल्याने अनुपस्थित होत्या. परंतु सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या श्रीमती शामला हावरे, जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका या उपस्थित होत्या. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा सर्व वेतन बिल लेखनिक हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.दिपक देविदास शिंदे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

➢ जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या मुद्दा क्र.अ, आ व इ इत्यादी माहिती अपिलार्थी श्री.दिपक देविदास शिंदे यांना पुढिल ८ दिवसात अपिलार्थी यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी व माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जातील अर्जदारांस जनमाहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती अथवा वागणूक देवू नये

कळावे,

4.05.18
(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

टिप –

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे - ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.दिपक देविदास शिंदे, रा.स.नं.११०, वंदे मातरम चौक, रामटेकडी, हडपसर, पुणे ४११०१३.
२. श्रीमती अस्मिता पोटे तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा प्र.उप अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्रीमती शामला हावरे जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
४. सर्व वेतन बिल लेखनिक तथा सहा.जनमाहिती अधिकारी लिपिक-टंकलेखक , महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.